N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

## (Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0693 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/07/2023 01:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावंधी):**

**Date From (दिनांक पासून):** 13/07/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/07/2023

**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/07/2023 **Time (वेळ):** 01:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/07/2023 01:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस अधीक्षक कोल्हापूर , कार्यालयातील महिला तक्रार ,निवारण कक्षात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री रोहीत रामचंद्र पोवार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा वाघवे, ता पन्हाळा,जिकोल्हापूर ,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा वाघवे, ता पन्हाळा,जिकोल्हापूर ,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | काजल गणेश लोढे महिला पोलीस कन्स्टेबल ब.नं.217 | | | 1. बंगला न10, पार्वती कन्स्ट्रक, सरनोबतवाडी, पसरीचा नगर,, ता करवीर, जि कोल्हापूर, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराच्या 4 भारतीय चलनी नोटा | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक - 14/07/2023

मी श्री रोहीत रामचंद्र पोवार, वय- 25 वर्षे, व्यवसाय - किरणा मालाचे दुकानात काम. रा. वाघवे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर मो.नं.9145673201.समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 13/07/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून त्यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, माझी पत्नी सौ अश्विनी ही माझे वडील व भाउ यांचेसोबत घरातील किरकोळ कारणावरून भांडण करते म्हणुन तिला समज दयावी म्हणुन मी तिचेविरूध्द पोलीस अधीक्षक कार्यालयातील महिला तक्रार निवारण कक्ष येथे तक्रारी अर्ज दिला होता. गावातील पोलीस पाटील यांनी तिला समजावुन सांगीतले होते तसेच पत्नी सौ अश्विनी ही गरोदर असलेने मी तिचेविरूध्द दिलेला तक्रारी अर्ज मागे घेणेबाबतचा जबाब सदर कार्यालयात दिला होता. त्यावेळी तेथील महिला पोलीस लोंढे मॅडम यांनी मी दिलेला तक्रारी अर्ज निकाली काढला म्हणून व त्याबाबतचे समजपत्र देण्याकरीता माझेकडे 10,000 रू. ची लाच मागणी केली त्यावेळी मी त्यांना माझी परिस्थीती नसल्याचे सांगितलेवर त्यांनी मला 2,000 रू.दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली आहे. तरी त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन मी स्वतः हस्तलिखीत तक्रारी अर्ज दिला लोंढे मॅडम मला वारवार फोन करून भेटायला बोलवित असुन आज रोजी मी लोंढे मॅडम यांना पोलीस अधीक्षक कार्यालयात असलेल्या महिला तक्रार निवारण कक्षामध्ये कार्यालयात भेटायला जाणार आहे असे सांगीतले. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करणेकरीता त्यांनी पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय पुजारी साहेबांना बोलावुन घेवुन त्यांना कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक नाळे साहेबांनी शासकीय पंच उपलब्ध करून घेतले व अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूरच्या कार्यालयात माझी पुजारी साहेब, दोन्ही पंचाची एकमेकांशी ओळख करून दिली पुजारी साहेबांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर पुजारी साहेबांनी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथुन कार्यालयातुन करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन महिला तक्रार निवारण कक्ष येथे कार्यरत असलेल्या महिला पोलीस लोंढे मॅडम यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 टोमके यांना दुपारी 14.05 वाजता माझेकडील मोटर सायकल एम.एच.09. एफएच- 4693 वरून पोलीस अधीक्षक कार्यालय कोल्हापूर येथील महिला तक्रार निवारण कक्षामध्ये पाठविले मी व पंच नं. 1 टोमके असे महिला तक्रार निवारण कक्षामध्ये गेलो तेथे लोंढे मॅडम नसलेने मी तेथे असलेल्या एका मॅडम यांना लोंढे मॅडम आहेत का? असे विचारले त्यावेळी त्यांनी नाही जेवायला गेल्या आहेत चार नंतर येतील असे सांगीतले. त्यानंतर मी माझे मोबाईल नंबर वरून लोंढे मॅडम यांचा मोबाईल नंबर 8329463146 वरती फोन केला त्यावेळी लोंढे मॅडम यांनी त्या जेवायला घरी गेल्या असुन चार नंतर या असे मला सांगीतले. त्यानंतर मी व पंच नं.1 टोमके असे अॅन्टी करप्शन चे ऑफीसमध्ये परत आलो. मला व पंच 1 टोमके यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन खात्री केली. लोंढे मॅडम यांनी मला चार नंतर बोलविल्याने पुढील कारवाई त्यावेळीच करण्याचे सर्वमते सांगीतले.

त्यानंतर पुजारी साहेबांनी मला पुन्हा योग्य त्या सुचना देवुन महिला पोलीस लोंढे मॅडम यांचे लाच मागणीचे पडताळणी करीता त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 टोमके यांना दुपारी 15.59 वाजता माझेकडील मोटर सायकल वरून महिला तक्रार निवारण कक्षामध्ये पाठवुन दिले. मी सदर कक्षामध्ये गेलो तेथे दुस-या मॅडम होत्या मी त्यांना लोंढे मॅडम जेवण करून आल्या का नाही असे विचारले. त्यावेळी त्यांनी लोंढे मॅडम यांना फोन लावला. त्यानंतर त्यांनी मला लोंढे मॅडम बेसमेंन्टला आल्या आहेत असे सांगीतले. लोंढे मॅडम वरती महिला कक्षामध्ये वरती आल्या त्यांची व माझी भेट झाली त्यावेळी लोंढे मॅडम समजपत्र

नेण्यासाठी आलो असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी पाच मिनट बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी थोडयावेळाने त्या समजपत्र घेवुन बाहेर आल्या व मला समजपत्र देवुन व्यवस्थित ठेवा परत कधी प्रॉब्लेम आला तर अर्ज करा फोन करा मला असे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांना फोन करतो मी... काय कमी जास्त करूया की.... काय... कस आहे मॅडम आमची परिस्थीती नाही आहे. मॅडमांशी बोलु काय थोडया वेळ असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम यांनी नाही राहु दे... किती म्हणता सांगा... मी सांगते त्यासनी असे म्हणाल्या. त्यावेळी मी त्यांना मॅडम तुम्ही 10,000/- रूपये रक्कम सांगितली होती. मला काय एवढे होणार नाही, मी किरणा मालाचे दुकानात कामाला आहे असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम तुम्हाला किती दयायला जमतय.. 2,000/- रूपये दया असे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांना एक तासाने पैसे घेवुन परत येतो असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच टोमके असे अॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमध्ये परत आलो. मला व पंच 1 टोमके यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन पुजारी साहेबांनी खात्री केली. त्यावेळी लोंढे मॅडम हया मी दिलेला तक्रारी अर्ज निकाली काढला व त्याबाबतचे समजपत्र देणेसाठी माझेकडे 2,000/- रूपये लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर महिला पोलीस लोंढे यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 2,000 /- रूपयांच्या नोटांना अॅथ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने पुजारी साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 टोमके असे ऑफीसमधुन माझेकडील मोटर सायकलवरून सायंकाळी 16.59 वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे असले महिला तक्रार निवारण कक्ष कार्यालयाकडे निघालो. त्यावेळी आमचे पाठोपाठ पुजारी साहेब, पंच नं.2 बनगे व सापळा पथकातील स्टाफ त्यांचेकडे उपलब्ध असले मोटर सायकलवरून आले व तेथे परिसरात सापळा लावुन थांबले. मी महिला तक्रार निवारण कक्षात गेलो तेथे लोंढे मॅडम नव्हत्या म्हणुन मी तेथील एका मॅडमना लोंढे मॅडम यांचेबाबत विचारले त्यावेळी त्यांनी लोंढे मॅडम यांना फोन केला त्यावेळी त्या मॅडमनी मला लोंढे मॅडम कोर्टात गेल्याचे सांगितले. त्यावेळी माझे मोबाईलवरती लोंढे मॅडम यांचा एक मेसेज आलेला होता तो मी पाहीला असता त्यामध्ये त्यांनी 5,000 आणुन दया 2,000 नाही म्हणत आहेत असा मजकुर होता. त्यावेळी मी त्यांना मॅडम गेटवर आहे, आला आहात काय, मला जायच आहे लवकर असे वगैरे मेसेज केले. त्यांनतर मी लोंढे मॅडम यांना फोन केला त्यानी दोन वेळा कॉल उचलला नाही. तिस-यावेळी लोंढे मॅडम यांनी कॉल उचलला व त्यांनी त्या बाहेर आल्याचे सांगितले व थोडावेळ थांबा येते असे म्हणाल्या. परत थोडावेळ थांबुन मी त्यांना कॉल केला त्यावेळी त्यांनी मला तुम्ही कोणत्या मार्गाने गावाकडे जाता असे विचारले त्यावेळी मी त्यांना कोल्हापूर रत्नागिरी रोडने जात असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी तुम्ही थांबा तिथेच मी येतो असे म्हणाल्या. काहीवेळाने लोंढे मॅडम त्यांचे कक्षात आल्या परंतु बराच वेळ मला बोलविले नाही म्हणुन मी त्यांना पुन्हा फोन केला त्यावेळी त्यांनी फोन कट केला व परत त्यांनी मला फोन केला थोडावेळ बाहेर थांबा आणि सरळ आत या कोणी नाही ऑफीसमध्ये या असे म्हणाल्या. त्यावेळी मी बर ठिक आहे म्हणुन त्यांचे कक्षात गेलो. त्यावेळी माझेत व त्यांचेत अर्जाचे अनुषंगाने व पत्नीचे विषयी बोलणे झाले. त्यावेळी लोंढे मॅडम ते तुम्हच का आला नाही...जबर बोलणी खायची... ते जाताना देवुन जावा असे म्हणाल्या. त्यावेळी मी त्यांना तुम्ही मला पाच हजार पाठवा असा मेसज केला असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम यांनी त्यासाठी बोलणी खाली... त्या अन्वये दुस-याचे ...बसा की इकडे बसा की... असे म्हणाल्या त्यावेळी मी तुम्ही म्हणताय पाच हजार पाठवा असे म्हणालो. त्यावेळी लोंढे मॅडम मी कुणाला सांगितल... असे म्हणाल्या त्यावेळी मी मॅडमसंगे बोलतो तरी म्हणटलो कारण मॅडम....असे म्हणालो. त्यावेळी लोंढे मॅडम यांनी मॅडम तस म्हणजे त्याचे फोन वगैरे ट्रॅप होतात ना... ऑफीस ... म्हणजे ऑफिसीयल कामाची अनऑफीसीयली असतात ती आमचे सारखीच लोकच करतात आणि... ही यांचा ...मग यांचा.... मग वरचा हा प्रत्येकाच ठरलेले असत असे म्हणाल्या त्यावेळी मी कोण मॅडम... असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम ते आहेत आता बंदोबस्ताला ...आता असे म्हणाल्या त्यावेळी मी बंदोबस्ताला आहेत काय असे विचारले त्यावेळी लोंढे मॅडम यांनी होय त्यामुळे सगळा प्रॉब्लेम झालाय असे म्हणाल्या. त्यावेळी मी त्यांना तुम्ही पाच हजार म्हंटल्यावर मी आता कोठुन आणनार पाच हजार असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम यांनी राहु दे... मला काय वाटल माहिति हाय... मी तुम्हाला जास्त... कळालच नाही वाटल... अस वाटल असे म्हणुन हाताने देणेबाबत इशारा केला त्यावेळी मी लोंढे मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम 2,000/- रूपये उजवे हाताने माझे पॅन्टचे उजवे खिशातुन पैसे काढुन त्यांना हे दोन हजार रूपये आहेत, चेक करून घ्या तुम्ही सांगितले तस असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम यांनी ठेवा तिथ असू दे असे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांचे समोरील टेबलवर वरती त्यांनी मागणी केलेले 2,000/- रूपये लाच रक्कम ठेवली. त्यांनतर लोंढे मॅडम यांनी असु दे.. आणि कागदे तेवढी ठेवा जपुन आणि सांभाळा असे म्हणाल्या. त्यावेळी मी ती इंट्रीला सही वगैरे असती समज

पत्राची... असे म्हणालो. त्यावेळी लोंढे मॅडम यांनी तुम्हची... माझी आहे त्यावरती...मॅडमची आहे आमच्या असे म्हणाल्या. त्यावेळी मी ठिक आहे चालतय.. व्यवस्थित मापुन घ्या.. दोन हजार आहेत असे म्हणालो. त्यावेळी लोंढे मॅडम यांनी असु दे असु दे.. मी सांगतो घ्या त्यांना अॅडमिट आहेत पाहुणे वगैरे सांगतो असे म्हणाल्या. त्यावेळी मी परत दोन हजार आहेत नव्ह ...बघीतल असे म्हणालो त्यावेळी लोंढे मॅडम यांनी नको असु दे जावा तुम्ही असे म्हणाल्या त्यानंतर मी महिला तक्रार निवारण कक्षातुन बाहेर येवुन मी माझा डावा हात डोक्यावरून फिरवुन पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच पुजारी साहेब तसेच सापळा पथकातील अंमलदार पंच नं.2 बनगे असे सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह महिला पोलीस लोंढे मॅडम यांना पकडले. त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यावेळी लोंढे मॅडम यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव काजल गणेश लोंढे, महिला पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.217 नेमणुक महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर, रा. बंगला नं.10, पार्वती कन्स्ट्रक्शन, सरनोबतवाडी, पसरीचा नगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी माझी पत्नी सौ अश्वीनी ही माझे वडील व भाऊ यांचेसोबत घरातील किरकोळ कारणावरून भांडण करते म्हणुन तिला समज दयावी म्हणुन मी तिचेविरूध्द पोलीस अधीक्षक कार्यालयातील महीला तक्रार निवारण कक्ष येथे तक्रारी अर्ज दिला होता. सदर मी दिलेला तक्रारी अर्ज निकाली काढला म्हणून व त्याबाबतचे समजपत्र देण्याकरीता माझेकडे 10,000 रू. ची लाच मागणी केली त्यावेळी मी त्यांना माझी परिस्थीती नसल्याचे सांगितलेवर त्यांनी मला 2,000 रू.दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे मॅडमचे नाव सांगुन अप्रामाणिकपणे तसेच स्वःताच्या फायदयाकरीता 2,000/- रूपयेची लाच मागणी करून सदरची लाच रक्कम 2,000/- रूपये स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्याला रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी काजल गणेश लोंढे, महिला पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.217 नेमणुक महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर, रा. बंगला नं.10, पार्वती कन्स्ट्रक्शन, सरनोबतवाडी, पसरीचा नगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असुन ती मी वाचुन पाहिली असता खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
dharmendra tanaji bagade
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** PMH75916
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथ खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Rohit

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Patil
ठाणे अंमलदार
शाहुपुरी पोलीस ठाणे

**Signature of Officer in charg**
**Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ajay janardan sin
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH46135